संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : १०१ वा ● ● मंगळवार दि. २० फेब्रुवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025




# गडकोट, किल्ले आपला ठेवा ; तो जपण्याचे काम करु

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव सोहळा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकोट किल्ले आपला ठेवा असून तो जपण्याचा प्रयत्न नक्की करू. पहिल्या टप्प्यात शिवाजी महाराजांशी संबंधित विविध २० पर्यटनस्थळे विकसित होत आहेत, त्यात किल्ले रायगडप्रमाणेच शिवनेरीचाही विकास करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सहकारमंत्री दिलीप-वळसे पाटील, खासदार डॉ.अमोल कोल्हे, आमदार अतुल बेनके, माजी खासदार तथा म्हाडाचे पुणे गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार शरद सोनवणे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य श्रीमती आशाताई



**पुणे : किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी उपस्थित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपस्थित मान्यवर**

बुचके, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांनी वास्तुकला, अभियांत्रिकी, किल्ल्यावरील प्रत्येक थेंब पाण्याचा उपयोग करून घेण्याची दूरदृष्टी दाखवली. शिवछत्रपती म्हणजे पराक्रम, शौर्य, त्याग, समर्पण आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते. ते सर्वव्यापी होते आणि त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले. ते युगपुरुष, युगप्रवर्तक आणि रयतेचे राजे होते. त्यांनी अठरापगड जातीचे, धर्मांचे लोक एकत्र आणले. प्रजेच्या दुःखापुढे, कल्याणापुढे स्वतःचे दुःख, आराम कवडीमोल मानला. ते केवळ व्यक्ती नाही तर विचार होते. शिवरायांकडील एक तरी गुण आपण घेतला तर शिवजयंती साजरी करताना त्यांना खरे अभिवादन ठरेल. त्यामुळे समाज, राज्य, देश आणि माणूस म्हणून आपण अधिक प्रगती करू.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देखील नौदलाच्या कार्यक्रमात शिवछत्रपती यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण केले. नौदलाच्या ध्वजावर शिवप्रतिमेला समाविष्ट केले, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. कुपवाडा येथे भारत पाकिस्तान सीमेवर लष्करी जवानांनी शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारला आहे. आग्र्याला देखील दिवाण-ए-आम येथे शिवाजी महाराजांची जयंती गतवर्षीपासून साजरी करीत आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकोट किल्ले जागतिक वारसा स्थळामध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रधानमंत्री यांनी शिफारस केली आहे. ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. जुन्नर पर्यटन तालुका असून बिबट सफारी विकसित करण्याचे घोषित केले आहे. येथील सुकाळवेढे, बोरघर, डूचकेवाडी, खेतेपठारमार्गे शिवजन्मभूमी आणि भीमाशंकर तीर्थक्षेत्रे जोडण्याचा प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले.

# कवठेमहांकाळ जवळ अपघातात कोल्हापूरचे तिघे जागीच ठार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कवठेमहांकाळ :** शिरढोण ता.कवठेमहांकाळ येथील रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूलावर चालकाचा ताबा सुटल्याने कार दुभाजकावर जोरदार आदळून झालेल्या अपघातात तीन जण जागीच ठार तर एक जण गंभीर जखमी झाला. सूर्यकांत दगडु जाधव, गौरी केदार जाधव, युवराज विजय जाधव अशी मृतांची नावे आहेत. तर प्रशांत चीले (सर्व रा. कोल्हापूर) हा गंभीर जखमी झाला. हा अपघात सोमवारी सायंकाळच्या सुमारास झाला.या अपघाताची नोंद कवठेमहांकाळ पोलिसात झाली आहे.



**कवठेमहांकाळ : शिरढोण येथे झालेल्या भीषण अपघातामधील कार**



**सुरेश जाधव युवराज जाधव गौरी जाधव**

याबाबत माहिती अशी की कोल्हापूर येथील जाधव कुटूंब सूर्यकांत जाधव, गौरी जाधव, युवराज जाधव, व प्रशांत चिले हे पंढरपूर येथे देवदर्शनासाठी गेले होते. पंढरपूरहून ते कोल्हापूरला कार क्रमांक (एम एच ०९ जी एफ ८३२३) ने जात असताना शिरढोण गावच्या हद्दीत चालकाचा ताबा सुटल्याने कार उड्डाणपूलावरील दुभाजकावर आदळली. यामध्ये सूर्यकांत जाधव, गौरी जाधव, युवराज जाधव हे जागीच ठार झाले. तर प्रशांत चिले हे गंभीर जखमी झाले. जखमी चिले यांना मिरज येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची नोंद पोलिसात झाली असून अधिक तपास पोलीस निरीक्षक संदीप कोळेकर करीत आहेत.

# यपावाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी प्रा. सदाशिव मोरे यांची निवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील यपावाडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच आकाराम मोरे यांनी राजीनामा दिल्याने यपावाडी ग्रामपंचायत उपसरपंचपद रिक्त होते. परंतु या रिक्त झालेल्या उपसरपंचपदी प्रा.सदाशिव मोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सुरुवातीला यपावाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी जेष्ठ नेते आकाराम मोरे यांना संधी देण्यात आली होती. परंतु कार्यकाल पूर्ण झाल्याने आकाराम मोरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंचपद रिक्त होते. यावेळी प्रा. सदाशिव मोरे यांना संधी देण्यात आली. दिनांक १६ रोजी झालेल्या निवडीमध्ये प्रा. सदाशिव मोरे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



**आटपाडी : यपावाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल प्रा. सदाशिव मोरे यांचा सत्कार करताना उपस्थित मन्यवर**

निवडी नंतर ग्रामपंचायत कार्यालयात प्रा. सदाशिव मोरे यांचा जेष्ठ नेते विष्णुपंत चव्हाण, आकाराम मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच संभाजी माने, राजेश चव्हाण, अजित चव्हाण, आकाश तळे, धनश्री चव्हाण, जयश्री चव्हाण, उज्वला चव्हाण, तुषार चव्हाण, सुनील मोरे, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामसेवक धिरज मोरे यांनी कामकाज पहिले.

# कौठुळी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रणजीत पाटील



**आटपाडी : कौठुळी ग्रामपंचायतीच्या नुतन उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल रणजीत पाटील यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** कौठुळी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी शाखाधिकारी सुभाष पाटील यांचे चिरंजीव रणजीत सुभाष पाटील यांची कौठुळी ग्रामपंचायत उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

कौठुळी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सुभाष पाटील यांचे अपघाती निधन झाले. यानंतर उपसरपंच पद हे रिक्त होते.त्यांच्या रिक्त जागेवर त्यांचे चिरंजीव यांची बिनविरोध ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवड झाली होती. तर उपसरपंच निवडीमध्ये रणजीत पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सौ.वर्षाराणी भारत कदम, ग्रामपंचायत सदस्य विश्वजीत कदम, बापू लोहार, शोभा चव्हाण, नीता कदम, अलका जावीर, भारतशेठ कदम, दिनेश कदम, राजू कदम, गणेश पाटील, महेश कदम,अजित कदम, किरण सावंत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. निवडणूक अधिकारी म्हणून देवानंद चव्हाण व ग्रामसेवक नंदकुमार भोसले यांनी कामकाज पाहिले. निवडीनंतर नूतन उपसरपंच रणजीत पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# शिवाजी पॉलिटेक्निक आटपाडीचे घवघवीत यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या हिवाळी परीक्षा २०२३ परीक्षेमध्ये शिवाजी पॉलिटेक्निक,आटपाडीच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले आहे.

यामध्ये संगणक विभागात नम्रता कुंभार हिने ८७.३८ टक्के, ऋषिकेश कोळेकर याने ७८.६७ टक्के, इलेक्ट्रिक विभागात सुशांत राऊत याने ८२.३० टक्के व सौरभ माने याने ७७.३८ % गुण मिळवले. तसेच प्रथम वर्षातील केतन आलदर या विद्यार्थ्याने ७२.०० टक्के गुण मिळवले. इलेक्ट्रानिक अण्ड टेलिकम्युनिकेशन विभागातून गायत्री अटकळे हिने ७५.०६ टक्के गुण मिळवले. याच बरोबर सिव्हील विभागातील रोहित कदम याने ७२.०० टक्के गुण मिळवून यश संपादन केले. श्रीराम बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तानाजीराव पाटील व संस्थेचे सचिव शिवाजीराव पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. आणि महाविद्यालायचे प्राचार्य कुलकर्णी.ओ.जी व उपप्राचार्य पवार.आर.बी व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# पोलीस माझे काहीही बिघडवू शकत नाहीत : नितेश राणे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**अकोला :** पोलीस आमच्या राज्यात आमच्यावर काय करणार? त्यांना जागेवर राहायचे आहे की नाही? ते माझ्या भाषणाचे चित्रीकरण करून केवळ बायकोला दाखवू शकतील. पोलीस माझे काहीही बिघडवू शकत नाहीत, असे वादग्रस्त विधान भाजप आमदार नितेश राणे यांनी येथे केले.



**नितेश राणे**

अकोला जिल्ह्यात रविवारी रात्री आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, माझे कोणी काहीही करू शकत नाही. पोलिसांना भाषणाचे चित्रीकरण करू द्या. ते काहीही करू शकत नाहीत. भाषणाचे चित्रीकरण केवळ बायकोला दाखवतील. आमच्या राज्यात आमच्यावर काही करू शकणार? त्यांना जागेवर राहायचे आहे की नाही?.

सर्वत्र अतिक्रमण केले जात आहे. राजरोसपणे हिंदू समाजाच्या कुटुंबांना त्यांच्या हक्काच्या घरातून बळजबरीने बाहेर काढण्याचे काम सुरू आहे, असा आरोप देखील नितेश राणे यांनी केला. हिंदू समाजावर होणारे आक्रमण रोखण्यासाठी प्रत्येक हिंदूंनी आवाज उचलला पाहिजे, असे आवाहन देखील त्यांनी केले. दरम्यान, नितेश राणेंच्या विधानावरून आता चौफेर टीका होत आहे.







# सर्वोच्च न्यायालयाकडून शरद पवार गटाला अंतरिम दिलासा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** केंद्रीय निवडणूक आयोगाने ७ फेब्रुवारी रोजी अजित पवार गटच मूळ राष्ट्रवादी पक्ष असल्याचा निर्णय दिला होता. तसंच, शरद पवार गटाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट असं नाव देण्यात आलं होतं. परंतु, हे नाव केवळ आगामी राज्यसभा निवडणुकीपुरतं मर्यादित असणार आहे. त्यामुळे हेच नाव कायम ठेवण्यात यावं आणि लवकरात लवकर चिन्ह मिळावं या मागणीकरता शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयाने धाव घेतली होती. या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने आज शरद पवार गटाला अंतरिम दिलासा दिला आहे. यावरून शरद पवारांनी त्यांच्या अधिकृत एक्स खात्यावरून पोस्ट केली आहे.

शरद पवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या शुभदिनी दिवशी, भारतीय निवडणूक आयोगाच्या आदेशाविरुद्ध माननीय सर्वोच्च न्यायालयाने आम्हाला अंतरिम दिलासा दिला आहे. हा मतदारांचा विजय आहे, कारण माननीय सर्वोच्च न्यायालयाने देशातील मतदारांना कमी लेखू नये असे निरीक्षण नोंदवले आणि मूळ पक्षाच्या तिकिटावर उमेदवार लढले त्याचे काय!, असा प्रश्न देखील उपस्थित केला.



**शरद पवार**

आम्हाला पूर्णपणे मान्यता देऊ नये या मागणीवर जोरदार टीका करण्याव्यतिरिक्त, अशाच वादामुळे अंतिम मुद्यावरील संबंधित परिस्थितीचा उल्लेख केला आहे. मध्यंतरी आम्हाला 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार' म्हणून मान्यता दिल्याबद्दल आणि माननीय ईसीआय ला आमच्या चिन्हासाठी आमच्या अर्जावर ७ दिवसांच्या आत विचार करण्याचे निर्देश दिल्याबद्दल आम्ही माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानतो, असं म्हणत शरद पवारांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावरून कृतज्ञता व्यक्त केली. तसेच लोकशाहीचा हा मोठा विजय आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानासाठी आम्ही लढत राहू. सत्यमेव जयते!,असंही शरद पवार म्हणाले.

**सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय**

निवडणूक आयोगाने अजित पवार गटाला मूळ पक्ष जाहीर केला आहे. तसंच, शरद पवार गटाच्या नव्या नावारही शिक्कामोर्तब केलं आहे. पुढील आदेश येईपर्यंत शरद पवार गटाने दिलेलं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे नाव कायम ठेवावं असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. तसंच, चिन्हासाठी शरद पवार गटाने अर्ज केल्यानंतर त्यांना आठवड्याभरात चिन्हाची नोंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याप्रकरणी आता पुढील सुनावणी तीन आठवड्यांनी होणार आहे.



## संपादकीय

### काँग्रेसला हे चार नेते तारू शकतात

काँग्रेस फुटणार आणि एक गठ्ठा भाजपमध्ये जाणार या चर्चा सध्या जोर धरू लागल्या आहेत. कारण, बहुमताने शिवसेनेचा एक गट भाजपसोबत गेला, बहुमताने राष्ट्रवादीचा एक गट सुद्धा भाजपसोबत गेला. तेव्हा वाटलं की काँग्रेस चे देवरा, सिद्दकी, चव्हाण हे काँग्रेस मधून बाहेर पडल्याने, एक गठ्ठा काँग्रेस आमदार बाहेर पडतील असे वाटत होते. परंतु सध्या काँग्रेसमध्ये राहून काँग्रेसला पुन्हा आणण्याचे काम करतील अशा चार युवा नेत्यांची मात्र राज्यात व काँग्रेस पक्षात जोरदार चारच सुरु आहे.

यातील पहिले नाव म्हणजे, प्रणिती शिंदे. काँग्रेस मधील मधलं महिला नेतृत्वामधी आक्रमक नाव म्हणून प्रणिती शिंदे यांच्याकडे पाहिजे जाते. भाजपकडून माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना भाजपची ऑफर दिली असल्याचे खुद्द सुशीलकुमार शिंदे यांनी जाहीरपणे सांगितले होते. कारण सध्या भाजपला लोकसभा जिंकायची आहे. सोलापूरच्या लोकसभेची गणित पाहता प्रणिती शिंदे सारख्या उमेदवारांची भाजपला अत्यंत गरज आहे. त्यामुळे त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा घडत असतात. परंतु प्रणिती शिंदे या भाजपमध्ये जाणार नाही असे त्यांचे कार्यकर्ते ठामपणे सांगत असतात. प्रणिती शिंदे या दलित समाजात येतात. त्यांचे नेतृत्व हे आक्रमक महिला नेतृत्व म्हणून ओळखले जाते. तसेच त्यांच्या सभामुळे मतदानामुळे फरक देखील पडू शकतो. त्यामुळे प्रणिती शिंदे या महिला आणि आक्रमक नेत्या अशा दोन्ही पात्यांवर काँग्रेसला अच्छे दिन आणणारा चेहरा निश्चितपणे ठरू शकतात.

यातील दुसरे नाव आहे ते सतेज उर्फ बंटी पाटलांचे. बंटी पाटील हे नाव कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणापुरते मर्यादित होतं. महाडिकांना विरोध म्हणून बंटी पाटलांच नाव आहे. पण भविष्यातल्या राजकीय कारकीर्दीची गरज ओळखून गेल्या दोन ते चार वर्षात बंटी पाटलांनी कोल्हापूरच्या बाहेर लक्ष द्यायला सुरुवात केली. प्रत्यक्ष मैदानात मनी आणि मसल पॉवर घेऊन विरोध करणारे नेते म्हणून बंडू पाटलांचे नाव आघाडीवर असते. संस्थात्मक राजकारणाचा पाया असणारे काँग्रेसचे वारसा असणारे नेते यामुळे काँग्रेसला पश्चिम दक्षिण महाराष्ट्रातल्या सांगली, सातारा, कोल्हापूर पट्ट्यामधील काँग्रेसची मते पुन्हा आपल्याकडे खेचून घेणे त्यांना सहज शक्य आहे. पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणात दबंग मसल पॉवर अशी त्यांची ओळख असल्याने त्याचा काँग्रेसला सुद्धा मोठा फायदा आगामी काळात होऊ शकतो.

काँग्रेसला वाचू शकतो असं तिसरं नाव आहे ते म्हणजे अमित देशमुख. अमित देशमुख यांच्या पक्षप्रवेशाच्या शक्यता या मागे पडल्या आहेत. अमित देशमुख मराठवाड्यातील मोठे नाव, त्यातही ते मराठा त्यामुळे मराठ्यांचे नेतृत्व अमित देशमुख यांच्या स्वरूपात काँग्रेसला मिळतात. अमित देशमुख यांनी लातूर सोडून काँग्रेसचा चेहरा होण्याच्या दिशेने विशेष असे काही काम केले नसले तरी, अशोक चव्हाण हे भाजपमध्ये गेल्याने मराठवाड्यातनं मराठा नेतृत्व म्हणून अमित देशमुख यांच्यासमोर सर्व पर्याय खुले आहेत. वडिलांचा वारसा आणि वडिलांना मानणारा जुना वर्ग यामुळे अमित देशमुख आपले राजकीय बळ सुद्धा शकतात आणि त्याचाच फायदा निश्चितपणे काँग्रेसला होऊ शकतो.

यातील शेवटचे नाव म्हणजे, विश्वजीत कदम. गेल्या काही दिवसांमध्ये विश्वजीत कदम यांच्या भाजप प्रवेशाच्या शक्यता बोलून दाखवल्या जातात. त्यांचे सासरे अविनाश भोसले हे चौकशीच्या फेऱ्यात अडकल्यानंतर ते सुद्धा कधीही भाजप सोबत जाऊ शकतात असं बोलत जात होते. परंतु शिक्षण संस्था आणि शिक्षण संस्थे यातून मिळणारी आर्थिक रसद याला भाजपकडून अडचणी निर्माण करण्याचे काम केले गेले. विश्वजीत कदम यांच्या विरोधात उमेदवार न देऊन भाजपने त्यांना पर्याय दिला होता. परंतु सध्या तरी याकेवळ चर्चाच होताना दिसत आहेत. विश्वजीत कदम काँग्रेससाठी एकबुस्टर होवू शकतात. याचे कारण म्हणजे त्यांच्या असणाऱ्या शिक्षण संस्था, हॉस्पिटल, बँका यामुळे ते काँग्रेसचे तारणहार नक्की होवू शकतात.

सध्या हे चारही नेत्यांची वयाच्या विचार केला तर तर पुढील ४० वर्षा पर्यंत राजकारण करू शकतात आणि काँग्रेसला पुन्हा शून्यातून वर आणण्याचा प्रयत्न करू शकतील. त्यामुळे आगामी काळात प्रणिती शिंदे, अमित देशमुख, सतेज उर्फ बंटी पाटील व विश्वजीत कदम हे चार युवा नेते काँग्रेसला तारू शकतात.






# शालेय शिक्षणात संत साहित्याचा समावेश असावा : राज्यपाल रमेश बैस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**ठाणे :** विश्वशांतीसाठी आंतरिक शांती, राष्ट्रांमध्ये परस्पर शांती तसेच पर्यावरण शांती असणे आवश्यक आहे, असे सांगून चारित्र्यवान पिढी निर्माण करण्यासाठी शालेय शिक्षणात संत साहित्याचा समावेश करणे नितांत आवश्यक असल्याचे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले. स्नातकांनी शिक्षण केवळ नोकरी अथवा चरितार्थासाठी न घेता ते चारित्र्य संपन्न व्यक्तिमत्व घडण्यासाठी घेतले तरच भारत विश्वगुरू होईल असे राज्यपालांनी सांगितले.



ठाणे : जैन विश्वभारती या अभिमत विद्यापीठाचा चौदावा दीक्षान्त समारोह कार्यक्रमात बोलताना राज्यपाल रमेश बैस

जैन विश्वभारती या अभिमत विद्यापीठाचा चौदावा दीक्षान्त समारोह राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (दि.१९) वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्र येथे संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

दीक्षान्त समारोहाला जैन तेरापंथ संप्रदायाचे प्रमुख आचार्य महाश्रमण, जैन विश्वभारती विद्यापीठाचे कुलपती तथा केंद्रीय विधी व न्याय राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) अर्जुन राम मेघवाल, विद्यापीठाचे कुलगुरू बच्छराज दुगड, जैन विश्वभारतीचे अध्यक्ष अमरचंद लुंकड, जैन साधू-साध्वी तसेच स्नातक उपस्थित होते.

जैन धर्माने नेहमीच शांती, अहिंसा व सामोपचाराचा पुरस्कार केला आहे, असे सांगून, जैन धर्माची शिकवण आजच्या जगात पूर्वीपेक्षा अधिक प्रासंगिक आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल होत असून युवकांनी नाविन्यतेच्या माध्यमातून नव्या वाटा शोधाव्या व आपल्या सामर्थ्याचे योग्य नियोजन करावे असे राज्यपालांनी सांगितले.

राज्यपालांनी यावेळी जैन तेरापंथ संप्रदायाचे प्रमुख आचार्य तुलसी, आचार्य महाप्रज्ञ तसेच विद्यमानआचार्य महाश्रमण यांच्या मानवसेवा कार्याचा गौरव केला.

संस्कार व मूल्य शिक्षणाशिवाय मनुष्य निर्माण कार्य होणार नाही असे सांगून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव करण्यात आला असल्याचे केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी सांगितले.

स्नातकांनी राष्ट्रहिताला प्रथम प्राधान्य द्यावे असे मेघवाल यांनी यावेळी सांगितले. जैन विश्वभारती विद्यापीठाने राष्ट्रीय पांडुलिपी मिशन सफल करण्यासाठी योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले.






# छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य, सर्वांसाठी प्रेरणादायक : डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य, ध्येय धोरण आजही आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायक आणि मार्गदर्शक आहे. त्यांचे कार्य, विचार व चरित्रापासून स्फूर्ती घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख-पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील, उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता सावंत-शिंदे, उपजिल्हाधिकारी सर्वश्री डॉ. विकास




सांगली : जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवर


खरात, अजय पवार, दीपक शिंदे, जिल्हा पुरवठा अधिकारी आशिष बारकुल यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख-पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याविषयी माहिती दिली व शिवजयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. प्रारंभी राज्यगीताने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

# चौथ्या कसोटीतून बुमराह बाहेर?

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** भारताचा आघाडीचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने आतापर्यंतच्या तीनही कसोटी सामन्यांत इंग्लंडच्या फलंदाजांना सळो की पळो करून सोडले आहे. मालिकेत सर्वाधिक विकेट घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत तो अव्वल स्थानी आहे. मात्र, चौथ्या कसोटीत तो खेळणार नसल्याची चर्चा आहे. वर्कलोड मॅनेजमेंटमुळे त्याला रांची कसोटीत विश्रांती दिली जाऊ शकते. त्याच्या आधी मोहम्मद सिराजला विशाखापट्टणम येथील दुसऱ्या कसोटी सामन्यात विश्रांती देण्यात आली होती. त्याचप्रमाणे बुमराह पुढील सामन्यात बेंचवर बसलेला दिसेल असे काहींचे म्हणणे आहे.

३० वर्षीय बुमराहने विशाखापट्टणम कसोटीत ९ विकेट घेत टीम इंडियाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती. तो सामना भारताने १०६ धावांनी जिंकत मालिकेत बरोबरी साधली होती. मालिकेतील तीन सामने खेळले गेले आहेत. दोन अजून बाकी आहेत. दरम्यान, बुमराहने मालिकेत ८०.५ षटके टाकली असून १३.६५ च्या सरासरीने १७ बळी घेतले आहेत. मार, त्याला विश्रांती मिळण्याची शक्यता आहे. रांचीची खेळपट्टी लक्षात घेता तिथे फिरकीपटू वर्चस्व आहे. त्यामुळे अशा स्थितीत



जसप्रीत बुमराह

बुमराहच्या जागी दुसरा वेगवान गोलंदाज खेळवला जाईल की संघ एका वेगवान गोलंदाजासह अतिरिक्त फिरकीपटूसह मैदानात उतरेल याची उत्सुकता लागली आहे.

मोहम्मद सिराजच्या जागी मुकेश कुमारला विशाखापट्टणम कसोटीत संधी मिळाली. त्याने सामन्यात ७० धावांत १ बळी घेतला. यानंतर त्याला रणजी ट्रॉफीतील सामन्यासाठी भारतीय संघातून मुक्त करण्यात आले. दुसऱ्या कसोटीनंतर आकाश दीपला संघात संधी मिळाली. रांची कसोटीसाठी तो सिराजसोबत सीम बॉलिंगचा पर्यायही असू शकतो. जर रांचीची खेळपट्टी फिरकीपटूंना अनुकूल असेल तर रोहित शर्मा आणि कंपनी अतिरिक्त फिरकीपटूची निवड करू शकते. राजकोटमध्ये इंग्लिश संघाने फिरकीपुढे नांगली टाकली. लोकल बॉय रवींद्र जडेजाने १३ व्यांदा पाच बळी घेत इंग्लंडच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. त्यामुळे बुमराहच्या जागी फिरकीपटू निवडण्याचा विचार केल्यास अक्षर पटेल किंवा वॉशिंग्टन सुंदरची निवड केली जाऊ शकते.









दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस

Email - netra7676@gmail.com
डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स्
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११



# निवृत्त सैनिक-समस्या सोडवण्यात कल्याण कार्यालय सदैव अग्रेसर : चंद्रकांत फाटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** भारतीय सैनिक अहोरात्र देशाच्या सीमांचे संरक्षण करीत असतो. निवृत्तीनंतर त्यांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यात सांगली जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सदैव अग्रेसर आणि तत्पर राहील अशी ग्वाही सांगली जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे सहाय्यक सैनिक कल्याण अधिकारी निवृत्त सुभेदार चंद्रकांत फाटक यांनी दिली आणि समस्यांच्या गांभीर्याबरोबरच त्यातील सहजसुलभता कथन केली.

भारतीय सैन्य दलाची एक शाखा, जिचा उल्लेख सैन्यदलाचा मेंदू, कान आणि चक्षू असा केला जातो. त्या सिग्नल कोअरचा ११४ वा स्थापना वर्धापन दिन डीएमए हॉल येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून फाटक बोलत होते.निवृत्त मानद कॅप्टन अर्जुन लिंगळे, नि.सुभेदार मेजर अनिल जवळेकर, नि.मानद कॅप्टन संजय शिंदे, ॲड. बी.बी.खेमलापूरे यांची



**सांगली : सिग्नल कोअर माजी सैनिक संघांच्या वर्धापनदिन निमित्त उपस्थित सुभेदार चंद्रकांत फाटक, सदानंद लेले व उपस्थित मान्यवर**

यावेळी प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नि.मानद सुभेदार मेजर राजेंद्र गावडे होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीलाच मान्यवर दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रमुख पाहुणे व प्रमुख उपस्थितांच्या हस्ते यावेळी श्री गणेश, श्री सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाबरोबरच संस्थेचे संस्थापक सचिव कै.हणमंत लेले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि उपस्थित ज्येष्ठ माजी सैनिक रंगराव शिंपुकडे यांच्याहस्ते श्रीफळ वाढवण्यात आले. कै.लेले यांच्या कन्या शुभदा पाटणकर आणि मानद कॅप्टन संजय शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते पाहुण्यांचा आणि सदानंद लेले यांचा सत्कार करण्यात आला. सदानंद लेले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित माजी सैनिक सिम्नलर यांना सैनिक कल्याणचे कल्याण अधिकारी अनिल जवळेकर सोयी सवलती विषयी आणि ॲड बी. बी. खेमलापूरे यांनी मार्गदर्शन करताना वारसा विषयक अधिक माहिती दिली.

यावेळी वर्धापन दिनानिमित्त माजी सैनिक, त्यांचे कुटूंबीय व बालकांसाठी मनोरंजनपर क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेनतर मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी नि. मानद कॅप्टन अर्जुन लिंगळे आणि प्रा. नंदकुमार सुर्वे यांचेही मार्गदर्शन लाभले. राष्ट्रगीताने आणि कोअर गीताने सुरू झालेल्या आणि अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साहाच्या या कार्यक्रमासाठी अनेक निवृत्त जेसीओ, निवृत्त मानद अधिकारी, नि. एनसीओ, निवृत्त सिम्नलर्स, त्यांचे कुटुंबीय आणि मुले, नातवंडे यांची मोठी उपस्थित होती. शेवटी सतीश पाटील यांनी आभार मानले.

# तरूण वयातचं जीवनाची दिशा कळते : शाहिर रणजित कांबळे

## राजे रामराव महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न


**जत : वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलताना शाहिर रणजीत कांबळे**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** समाज माध्यमाच्या युगात तरुण विद्यार्थी सैरभैर झाले असून विद्यार्थ्यांनी शिक्षण, आरोग्य, आपली आवड, व करियर याकडे लक्ष दिले पाहिजे. शिक्षणाचा आनंद घेत व आपली आवड जोपासत या वयातचं जीवनाची दिशा कळायला मदत होते, असे प्रतिपादन विद्रोही शाहिर रणजित आशा अंबाजी कांबळे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्थापन समितीच्या सदस्या श्रीमंत जोत्स्नाराजे डफळे या होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील, वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे कार्याध्यक्ष प्रा.महादेव करेन्नवर, प्रा.सिद्रामदादा चव्हाण, प्रा.श्रीमंत ठोंबरे व माजी प्राचार्य शिवाजीराव बिसले हे उपस्थित होते.

आजच्या तरूणांमध्ये प्रचंड उर्जा आहे. या उर्जेचा वापर चांगल्या कार्यासाठी केला तर जीवन सुखी व आनंदी होते, असे सांगून शाहिर रणजीत कांबळे पुढे म्हणाले की, खडतर परीस्थितीतुनच माणसाची समृद्धी होत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळेचे व्यवस्थापन करून आपले जीवन घडवावे व समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करावे असेही ते म्हणाले.

प्रारंभी विद्यार्थ्यांनी केलेल्या लिखित व मुद्रित शेला-पागोटा यांचे वाचन व सादरीकरण महाविद्यालयातील प्राध्यापकांनी केले. त्यानंतर वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रम सुरू झाला. शारीरिक शिक्षण संचालक प्रा.अनुप मुळे व प्रा.अभिजीत चव्हाण यांनी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्रीडा अहवालाचे वाचन व वर्षभरात क्रिडा क्षेत्रातील खेळाडूंनी मिळवलेल्या यशाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष यांच्या वतीने प्रा.रवींद्र काळे यांनी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या अहवालाचे वाचन करून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये केलेल्या विविध कामांचा आढावा घेतला.

यावेळी महाविद्यालयाच्या वतीने गुणवंत प्राध्यापकांचा सन्मान करण्यात आला. विद्यावाचस्पती ही सर्वोच्च पदवी मिळवणारे डॉ.नारायण सकटे, एम. फिल ही पदवी प्राप्त केलेले प्रा.तुकाराम सन्नके, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विशेष कक्ष स्थायी समिती सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल डॉ.राजेंद्र लवटे, यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन प्रमुख पाहुणे व अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर विविध स्पर्धेत यश मिळविलेल्या खेळाडूंचा व गुणवंतांचा सत्कार प्रमुख पाहुणे व अध्यक्षांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

त्याचबरोबर राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन काव्यवाचन स्पर्धा व राष्ट्रीय सेवा योजनेतील गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांनी तर प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ.अशोक बोगुलवार यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा.धनंजय वाघमोडे व प्रा.अतुल टिके यांनी तर आभार प्रा.मेहजबिन मुजावर यांनी व्यक्त केले. प्रा.शिवाजी चव्हाण, श्री.राजेंद्र माने सर, श्री.वसंतराव मोरे सर यासह श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विविध संस्कार केंद्रातून सेवानिवृत्त झालेले शिक्षक व कर्मचारी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलाठी भरती निवड यादीत टॉपर असलेल्या दोन उमेदवारांविरुद्ध गुन्हे दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**लातूर :** लातूर येथील गुरू ऑनलाईन एक्झाम सेंटर येथे परीक्षा देणाऱ्या दोन उमेदवारांविरुद्ध धाराशिव येथील आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे दोघेही निवड यादीत टॉपर आहेत. तलाठी भरतीसाठी दहा लाखांपेक्षा जास्त उमेदवारांनी अर्ज केले होते तर सरासरी आठ लाख उमेदवारांनी परीक्षा दिली होती. अनेक कारणांनी तलाठी भरती चर्चेत होतीच पण आता तलाठी भरती घोटाळ्याला निर्णायक वळण मिळाले आहे. लातुरातील अख्खे परीक्षा केंद्रच मॅनेज असल्याची माहिती समोर आली आहे.

तलाठी भरतीत ४,६०० पेक्षा जास्त पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आणि टीसीएस आयओएन कंपनी मार्फत परीक्षा घेण्यात आल्या होत्या. परीक्षेनंतर ५ जानेवारी २०२४ रोजी सर्व उमेदवारांच्या गुणांचे सामान्यकरण करून जिल्हानिहाय निवड याद्या जाहीर करण्यात आल्या होत्या. लातूर शहरातील गुरू ऑनलाईन परीक्षा केंद्रात गैरप्रकार झाल्याचे समोर आले आहे. परीक्षा केंद्रातील कर्मचारी किंवा केंद्राचा मालक यात सहभागी असल्याचा संशय निर्माण झाला आहे.

# कुठे येणार नाही आणि जाणार नाही : जयंत पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पश्चिम महाराष्ट्रातला एक बडा नेता भाजपात जाणार अशी चर्चा रंगली आहे. भाजपा शरद पवार गटाला आणखी एक धक्का देणार असंही बोललं जातं आहे. तसंच हे नाव दुसऱ्या तिसऱ्या कुणाचं नसून जयंत पाटील यांचं आहे. जयंत पाटील यांच्या भाजपा प्रवेशाची चर्चा रंगली आहे. या सगळ्या चर्चांवर दस्तुरखुद्द जयंत पाटील यांनी मौन सोडलं आहे.

काही कुठे येणार नाही आणि जाणार नाही. माझ्या नावाची चर्चा असेल तर चांगलंच आहे. प्रसिद्धी मिळाली की लोकांसमोर जाता येतं. आपण यावर नंतर बोलू. असं म्हणत जयंत पाटील यांनी या सगळ्या गोष्टींवर मौन सोडलं आहे.

गेल्या वर्षी मे महिन्यात जेव्हा शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिली तेव्हा जयंत पाटील रडले होते. शरद पवारांचे अत्यंत निष्ठावान आणि विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चांचा विषय त्यांनी अवघ्या तीन ओळींमध्ये संपवला आहे.

# रजनीताई सातव यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**हिंगोली :** माजी मंत्री रजनीताई सातव (वय ७६) यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर काल (दि. १९) दुपारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मराठवाडा, विदर्भातील राजकीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आदीसह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

दीर्घ आजाराने ग्रस्त रजनीताई यांची प्रकृती खालावल्याने त्यांना दोन दिवसांपूर्वी नांदेड येथे खाजगी रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचार सुरू असताना अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाच्या वृत्तामुळे जिल्ह्यात शोककळा पसरली. त्यांच्या निवासस्थान कोहिनूर येथे त्यांचे पार्थिव


**हिंगोली : रजनीताई सातव यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.**

अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले. हजारो कार्यकर्ते, नागरिक व महिलांनी अंतिम दर्शनासाठी गर्दी केली होती.

रजनीताई यांच्या पश्चात सून आमदार प्रज्ञा सातव, नातवंडे पुष्कराज व तितली असा परिवार आहे. काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांचे त्या आई होत. यावेळी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, शासकीय अधिकारी हजर होते. तर अंतिम संस्कारवेळी खा.हेमंत पाटील, आ माधवराव पाटील जवळगावकर, माजी मंत्री सुर्यकांता पाटिल, माजी खा.ॲड शिवाजी माने, माजीमंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी मंत्री माधव किन्हाळकर, भाऊराव पाटील, विजय खडसे, नागेश पाटील आष्टीकर, संतोष टार्फे, शेतकरी नेते अजित मगर, काँग्रेस प्रदेश सचिव बाळासाहेब देशमुख, आदीसह सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी आजी माजी लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, कळमनुरी मतदारसंघातील नागरिक व महिलांनी उपस्थिती लावली होती.

# कुपवाडा येथील भारत-पाक नियंत्रण रेषेजवळ शिवजयंतीचा सोहळा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** काश्मीरमधील कुपवाडा येथील भारत-पाक नियंत्रण रेषेजवळ उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या ठिकाणी शिवजयंतीचा कार्यक्रम झाला. सर्वत्र बर्फाच्छादित वातावरण, उणे तापमानात लष्कराच्या जवानांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय लष्कराच्या जवानांचे अभिनंदन करीत त्यांचे कौतुक केले. हिमवर्षावातदेखील काश्मीर खोऱ्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा जय घोष दुमदुमला.

गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले होते. काल याठिकाणी मराठा बटालियनच्या जवानांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अनोखी सलामी दिली. कुपवाडा येथे


**कुपवाडा : येथील येथील भारत-पाक नियंत्रण रेषेजवळ बर्फाच्छादित वातावरण, उणे तापमानात लष्कराच्या जवानांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले**

उणे तापमानात हा अनोखा कार्यक्रम झाला. सभोवताली सर्वत्र बर्फ अशा कठीण परिस्थितीतही आपल्या जवानांनी महाराजांना जयंती दिनी केलेले अभिवादन पाहून अभिमान वाटल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पुतळा देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना प्रेरणादायी, उर्जादायी ठरेल, त्यांचे मनोबल उंचावत राहील, असे मुख्यमंत्री पुतळा अनावरण समारंभात म्हणाले होते.त्याची प्रचिती आज आली. आम्ही पुणेकर संस्था, ४१ राष्ट्रीय रायफल मराठा बटालियन यांच्या माध्यमातून कुपवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्यात आला आहे. त्याचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्याला जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार आदी मान्यवर उपस्थित होते. अश्वारुढ पुतळ्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पाकिस्तानच्या दिशेने बघत आहेत. त्यांच्या हातात तलवार आहे. जवानांनी सुमारे १८०० ट्रक माती भरून पुतळ्यासाठी भक्कम पाया केला होता.



# जिहे-कटापूर सिंचन योजनेतून वंचित गावांच्या सर्वेक्षणासाठी ९६ लाखांचा निधी

## अरूण गोरे : आ. जयकुमार गोरेंच्या प्रयत्नातून वंचित गावांनाही मिळणार जिहे कटापूरचे पाणी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**म्हसवड/प्रतिनिधी :** माण- खटावचे आ.जयकुमार गोरे यांनी मतदार संघातील सिंचन योजना मार्गी लावत जनतेला दिलेला शब्द पाळला आहे. माण तालुक्याच्या उत्तरेकडील सिंचन योजनेपासून वंचित असलेल्या गावांनाही पाण्याचा शब्द दिला होता तो त्यांनी पूर्ण केला आहे. जिहे कटापूरचे पाणी आंधळी धरणात आणून ऐतिहासिक कामगिरी करून दाखवली आहे. या योजनेतून पहिल्या टप्प्यातील गावांची कामे सुरू आहेत. तर उत्तर माणधील उर्वरित बिजवडीसह इतर २२ गावे व पश्चिमेकडील महिमानगडसह ९ गावे अशा एकूण ३१ वंचित गावांनाही विस्तारित जिहे-कटापूर सिंचन योजनेतून पाणी देण्यासाठी १.१५ टीएमसी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. त्यातून या गावांना पाणी देण्यात येणार आहे. यासाठी याचे सर्वेक्षण करण्यात येत असून त्यासाठी ९६ लाख ७३ हजार रूपये मंजूर झाले आहेत. लवकरच याचा सर्वे पूर्ण होईल. त्यामुळे या योजनेतून उर्वरित गावांनाही पाणी मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. अशी माहिती सिध्दनाथ पतसंस्थेचे चेअरमन अरूण गोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.


जयकुमार गोरे

सिंचनापासून वंचित असणाऱ्या उत्तर माणमधील गावांना गुरुवर्य कै.लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजनेचे (जिहे कठापूर) पाणी मिळवण्यासाठी आ.जयकुमार गोरे यांनी अथक प्रयत्न केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांना यश आल्यामुळेच जिहे कटापूरचे पाणी आंधळी धरणात पोहचले आहे. दि.२१ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते या पाण्याचे पूजन केले जाणार आहे. या योजनेपासून वंचित असलेली बिजवडीसह इतर गावांना जिहे कटापूर चे पाणी मिळणार नाही,त्यांचा या योजनेत समावेश नाही असे काहीजण वक्तव्ये करत जनतेची दिशाभूल करत आहेत. बिजवडीसह उर्वरित सर्व गावांना जिहे कटापूरचे पाणी देण्यासाठी आ.जयकुमार गोरे समर्थ आहेत. आजपर्यंत कोणत्याच राज्यकर्त्याला जमले नाही ते आ.गोरेंनी करून दाखवले आहे. त्यामुळे पाण्याची चिंता कोणी करू नये. या भागातील गावांना पाणी देण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे यासाठी निधीही मिळालला आहे. सर्व्हे पूर्ण झाला की ही कामेही सुरू होणार असल्याची माहिती अरूण गोरेंनी दिली.

**या २२ गावांचे होणार सर्वेक्षण**
खुटबाव,कारखेल,शिखर शिंगणापूर ,वावरहिरे, तोंडले,जाधववाडी,राजवडी,मोगराळे,बिजवडी, पांगरी, टाकेवाडी, लक्ष्मीनगर (अनभुलेवाडी), पाचवड, हस्तनपूर (घेरेवाडी),थदाळे, शंभुखेड, हवालदारवाडी, मोही, इंजबाव, दानवलेवाडी, येळेवाडी, परकंदी, शिरवली, पांढरवाडी, कोळेवाडी, दिवडी, महीमानगड, उकिर्डे, पिंगळी बु.,सत्रेवाडी, मलवडी, या उर्वरित ३१ गावांना जिहे कटापूरचे पाणी देण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांना जयंती निमित्त जिल्हा प्रशासनातर्फे अभिवादन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** छत्रपती शिवाजी महाराज यांना त्यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे अभिवादन करण्यात आले. शिवाजी मंडई सांगली येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.


सांगली : जिल्हा प्रशासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवर

या कार्यक्रम प्रसंगी आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, पोलीस अधिक्षक संदीप घुगे, महानगरपालिका आयुक्त सुनील पवार, माजी आमदार दिनकर पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल ओसवाल, अप्पर पोलीस अधिक्षक रितू खोखर यांच्यासह शिवजन्मोत्सव समितीचे पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
यावेळी मान्यवर लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रारंभी राज्यगीत वादन करण्यात आले.

# कृष्णा प्रदुषणाबद्दल सांगली महापालिकेला ९० कोटीचा दंड




**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** प्रक्रिया न करता सांडपाणी सोडून कृष्णा नदी प्रदुषित केल्याबद्दल सांगली महापालिकेला ९० कोटी रूपयांचा दंड प्रदुषण नियंत्रण मंडळाने ठोठावला असल्याची माहिती ॲड. ओंकार वांगीकर, सुनील फराटे व तानाजी रूईकर यांनी सोमवारी पत्रकार बैठकीत दिली.
जुले व ऑगस्ट २०२२ मध्ये कृष्णेतील पाणी प्रदुषणामुळे मोठ्या प्रमाणात माशांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी नदी प्रदुषणाची सखोल चौकशी करून दोषीविरूध्द कारवाई करण्यासाठी श्री. फराटे यांच्यावतीने हरित न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. हरित न्यायालयाने चौकशी समिती नियुक्त करून अहवाल मागवला होता. चौकशी समितीच्या अहवालानुसार काही कारखाने आणि सांगली महापालिका यांना नदी प्रदुषणास जबाबदार ठरविण्यात आले होते. यानुसार काही कारखान्यांना दंड ठोठावण्यात आला.
प्रदुषण नियंत्रण मंडळाने नदी प्रदुषित केल्याबद्दल महापालिकेला ९० कोटींच्या दंडाची नोटीस दि. १७ फेब्रुवारी रोजी बजावली आहे. दंडाची रक्कम येत्या १५ दिवसात भरण्याचे निर्देशही नोटीसमध्ये देण्यात आले आहेत. सुनावणी वेळी याचिकाकर्त्यांवतीने ॲड. वांगीकर यांनी वारंवार महापालिकेवर दंडाची कारवाई केली जात असतानाही प्रक्रिया न करता सांडपाणी नदीत सोडले जात असल्याचे निदर्शनास आणून दिले. यावर या प्रकरणी उचित कारवाईचे निर्देश प्रदुषण मंडळाला न्यायालयाने दिले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# कौठुळीत खेळ पैठणीचा कार्यक्रम संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील कौठुळी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. वर्षाराणी कदम यांनी महिलांसाठी हळदी कुंकु व होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमात आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. विजेत्या प्रथम तीन क्रमांकांना पैठणी साडी देण्यात आल्या. चौथे बक्षिस नाकातील नथ व पाचवे बक्षिस जोडव देण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व महिलांना आंब्याचे रोप भेट म्हणून देण्यात आले.



आटपाडी : कौठुळी येथे खेळ पैठणीचा कार्यक्रमास उपस्थित लोकनियुक्त सरपंच वर्षाराणी कदम व उपस्थित महिला वर्ग

कार्यक्रमास माजी जि.प. सदस्या मनिषा पाटील, राष्ट्रवादी महिला उपाध्याक्ष अनिता पाटील,दिघंची गावच्या लोकनियुक्त सरपंच माधुरी मोरे यांच्यासह गावातील महिला कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवरायांनी मावळ्यांच्या अंतःकरणात राष्ट्रनिष्ठा पेरली

## प्रा.स्वामीराज भिसे : स्वेरीत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती उत्साहात साजरी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**पंढरपूर :** 'छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य व योगदान अवघ्या विश्वात पोहचले आहे परंतु त्यांची सक्षम प्रशासकीय व्यवस्था जी त्यांनी अत्यंत प्रभावीपणे राबविली हा त्यांच्या कार्यातील अतिशय महत्वाचा भाग आहे. शिवरायांचे मावळे एवढे एकनिष्ठ होते की ते अखेरच्या श्वासापर्यंत कोणाच्याही आणि कोणत्याही प्रलोभनाला बळी पडले नाहीत.कोणत्या ठिकाणी कोणत्या कामगिरीसाठी कोणता सैनिक नेमावा? हे राजांकडून शिकावे. कोंडाजी फर्जद यांना लढायला जाण्यापूर्वी त्यांना सोन्याचे कडे बक्षीस म्हणून दिले.यावरून 'माणूस जिवंत असताना त्यांचा सन्मान करणे' राजांना खुप महत्वाचे वाटत असायचे. यावरून राजांच्या विचारांतील कल्पकता व नेतृत्वक्षमता समजते. त्यांनी मावळ्यांना स्वतःच्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे वागणूक दिली, आणि त्यांना जपले. त्यामुळे मावळ्यांच्या अंगी स्वराज्याबाबत आपलेपणाची भावना निर्माण झाली. एकूणच राजांनी सर्व मावळ्यांच्या अंतःकरणात राष्ट्रनिष्ठा पेरली होती म्हणून हिंदवी स्वराज्य निर्माण झाले.' असे प्रतिपादन पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा. स्वामीराज भिसे यांनी केले.


पंढरपूर : स्वेरीत शिवजयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करताना पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सांस्कृतिक कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.स्वामीराज भिसे व उपस्थित मान्यवर

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मध्यवर्ती असलेल्या भव्य ओपन एअर थिएटरमध्ये आयोजिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९४ व्या जयंती निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. स्वामीराज भिसे हे आपले विचार मांडत होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे 'प्रभावी प्रशासन' या विषयावर अतिशय मौल्यवान विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मंत्रालयातील सचिव आनंदराव माळी हे होते तर विशेष अतिथी म्हणून विवेकवर्धिनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.आर.मुंडे हे उपस्थित होते.
यावेळी आर्किड इंजिनिअरिंग कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ.जे.पी.दफेदार, स्वामी विवेकानंद इन्स्टिटयूट, खेड चे प्राचार्य डॉ.एस. एस. पाटील, भीमराव जाधव, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त प्रा.सी.बी.नाडगौडा, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी.रोंगे, श्री.विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन व स्वेरीच्या विश्वस्त सौ.प्रेमलता रोंगे, युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग, इंजिनिअरिंग व फार्मसीचे स्टुडंट कौन्सिलचे सचिव आदित्य जगदाळे, पूजा बत्तुल आणि इंजिनिअरिंग व फार्मसीमधील चारही महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.
आदित्य भुसनर व डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी आनंददायी वातावरणात परीक्षा द्यावी : दीपक केसरकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**मुंबई :** दिनांक २१ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या बारावीच्या परीक्षांसाठी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. लिखाणासाठी वेळ कमी पडू नये, यासाठी शेवटची १० मिनिटे वाढवून दिली जाणार असल्याने विद्यार्थ्यांनी आनंददायी तसेच तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले आहे.
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या इयत्ता १२ वीच्या लेखी परीक्षांना बुधवार दि. २१ फेब्रुवारी पासून सुरूवात होत आहे. राज्यातील नऊ विभागीय मंडळांमध्ये इयत्ता १२ वी साठी एकूण तीन हजार ३२० केंद्रांवर १५ लाख १३ हजार ९०९ विद्यार्थी परीक्षा देणार असून परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना केल्या जात आहेत. कमी गुण मिळालेल्या अथवा यशस्वी न होऊ शकलेल्या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये यासाठी जुलै महिन्यात पुरवणी परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे.


दीपक केसरकर

विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करता यावी यासाठी मंडळामार्फत सप्टेंबर महिन्यात संभाव्य वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले. तर, परीक्षेचे अर्ज ऑनलाईन स्वीकारण्यात येऊन प्रवेशपत्रदेखील ऑनलाईन पद्धतीने वितरित करण्यात आले. परीक्षा निकोप व्हाव्यात, विद्यार्थ्यांचे परीक्षांबाबत दूरध्वनीद्वारे शंका समाधान व्हावे यासाठी समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच विभागीय मंडळ स्तरावर नियंत्रण कक्ष आणि हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक सोयीसुविधा देण्यात येत आहेत.
परीक्षा सुरळीत व्हाव्यात यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठीदेखील उपाययोजना केल्या जात आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलाची मदत घेतली जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांनी तणावमुक्त आणि भयमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी, असे आवाहन मंत्री श्री.केसरकर यांनी केले आहे.





